ePaper
'स्वत:ला 'राजे' समजणाऱ्या भाजप नेत्यांना जनतेने त्यांची जागा दाखवली!




|| वर्ष - 7 | अंक - 337 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- रक्ताचा नमुना आईचाच!
- जसप्रीत बुमराहने रचला इतिहास
- प्रार्थना बेहेरेने मागितली माफी
- पण सरकार टीकणार नाही!


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 6 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महाराष्ट्र भाजपामध्ये होणार खांदेपालट

# विनोद तावडे नवे 'कारभारी' ?

### » देवेंद्र फडणवीस राजीनाम्याच्या तयारीत : संघटनात्मक जबाबदारी घेणार!

**| मुंबई | महाईन्यूज**

**महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठा धक्का बसलाय. लोकसभा निवडणुकीनंतर आता काही महिन्यांनी विधानसभेच्या निवडणुकाही होणार आहेत. त्यामुळे महायुतीला आत्मचिंतन करावे लागणार आहे. राज्यात मराठा समाजाची संख्या मोठी आहे. हे पाहता सध्या भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदाची जबाबदारी सांभाळणारे विनोद तावडे यांना पक्षाचे केंद्रीय नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात परत आणू शकते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. महायुतीला ४५ हून अधिक जागांचा दावा करण्यात आला होता. पण त्यांना फक्त १७ जागा मिळाल्या आहेत. २३ जागा असलेल्या भाजपला यंदा फक्त ९ जागा मिळाल्या आहेत. या निवडणुकीत भाजपला मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे मराठा तरुणांच्या नाराजीलाच सामोरे जावे लागलेय.**




### पंकजा मुंडे यांचा पराभव

भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या पंकजा मुंडे यांनाही या निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले. पंकजा मुंडे यांच्या जवळचे धनगर नेते महादेव जानकर यांचाही पराभवाचा धक्का बसला आहे. परभणीतून त्यांना तिकीट देण्यात आलं होतं. भाजपला या दोन्ही जागांवर मोठा धक्का बसला आहे.

भाजप सोडून राष्ट्रवादीत दाखल झालेले ओबीसी नेते एकनाथ खडसे हे पुन्हा भाजपमध्ये येणार असल्याची चर्चा होती. पण तसे अजूनही झाले नाही. त्यामुळे याचा ही फटका त्यांना बसला असावा. भाजपला या गोष्टी हाताळण्यात अपयश आले.

### मनोज जरांगे यांचा फटका...

अवघ्या चार महिन्यांनी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. महाराष्ट्रातील भाजपचा चेहरा असलेले देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा निवडणुकीतील अपयशामुळे उपमुख्यमंत्रिपदाच्या सध्याच्या जबाबदारीचा राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तयारीवर त्यांना पूर्ण लक्ष केंद्रित करायचे आहे. असं त्यांनी म्हटलंय. मराठा, ओबीसी, एससी आणि एसटी समाजाने पाठ फिरवल्याने भाजपला या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरंगे पाटील यांची फडणवीसांप्रती असलेली कटुता सर्वश्रुत आहे. इतर मराठी भाषिक समाजही फडणवीस यांच्यावर नाराज होता. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससारखे प्रादेशिक पक्ष फोडल्याचा आरोप त्यांच्यावर असल्याने अनेक लोकं नाराज होते. अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे त्यांना अनेक जागा गमवाव्या लागल्या. ज्या विदर्भातून देवेंद्र फडणवीस येतात, त्या नागपूरमध्ये भाजपला फक्त एक जागा जिंकता आली आहे. तेही नितीन गडकरींनी केलेल्या कामामुळे मिळाले आहे.

### विनोद तावडे केंद्राची पहिली पसंती

आता देवेंद्र फडणवीस यांच्या जागी कोणता चेहरा पुढे येऊ शकतो याची चर्चा सुरु झाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपला नवा चेहरा हवा आहे. यामध्ये भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे हे केंद्राची पहिली पसंती असू शकतात.

भाजपचे ज्येष्ठ नेते प्रमोद महाजन यांच्यानंतर राष्ट्रीय सरचिटणीस झालेले विनोद तावडे हे महाराष्ट्रातील पहिले नेते आहेत. गेल्या काही वर्षांत विनोद तावडे यांना स्वतला सिद्ध केले आहे. त्यांच्याकडे बिहार आणि हरियाणाचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. ती त्यांनी सिद्ध केली. आपली राजकीय परिपक्वता त्यांनी दाखवून दिली आहे. दिल्लीच्या राजकारणात आता विनोद तावडे यांना चांगला अनुभव मिळाला आहे. ते स्वतः मराठा समाजातून येतात. त्यामुळे महाराष्ट्र भाजपला सध्या सर्वाधिक गरज त्यांची भासत आहे.

### जनतेनं भाजपाला त्यांची जागा दाखवली

**लोकसभा निवडणुकीच्या निकालात महाराष्ट्र राज्यातील भाजपच्या दारुण पराभवाची जबाबदारी घेत उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची तयारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवली आहे. फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा किंवा नाही हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. पण, जनतेने भाजपला त्यांची जागा दाखवली आहे. असे मत महाराष्ट्र काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले. ते आज त्यांच्या गृहग्राम सुकडी येथे वाढदिवसानिमीत्त असलेल्या कार्यक्रमात माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना बोलत होते. ते म्हणाले की, जनता भाजपचा मागील १० वर्षांचा कार्यकाळ पाहून पूर्णतः वैतागली आहे. त्यातच महाराष्ट्र राज्यातील गंभीर होत असलेले बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यात हे सरकार अपयशी ठरले आहे. या सोबतच हापुरुषांचा अपमान, जाती जातीत लावलेले भांडण या सर्व बाबींमुळे नाराज असलेल्या राज्यातील जनतेने यांना त्यांची जागा दाखवली आहे, असे पटोले म्हणाले.**

# रक्ताचा नमुना आईचाच!

## अगरवाल दाम्पत्यासह डॉक्टरांच्या पोलीस कोठडीत वाढ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कल्याणीनगर अपघात प्रकरणातील मुलाला वाचविण्यासाठी त्याची आई शिवानी अगरवालने रक्ताचा नमुना दिला होता. शिवानीने पुरावा नष्ट करण्यासाठी हे कृत्य केले. रक्ताचा नमुना आईचा असल्याचा अहवाल प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेने दिला आहे, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी न्यायालयात दिली.**

याप्रकरणात अल्पवयीन मुलाची आई, बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल, ससूनमधील डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याचे आदेश विशेष न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांनी बुधवारी दिले. कल्याणीनगर अपघात प्रकरणात शिवानी अगरवाल, विशाल अगरवाल (दोघे रा. ब्रह्मा सनसिटी, वडगाव शेरी), ससूनमधील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे डॉ. अजय तावरे, आपत्कालीन वैद्यकीय विभागातील अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे यांच्या पोलीस कोठडीची मुदत संपली. त्यानंतर त्यांना बुधवारी शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने अगरवाल दाम्पत्याच्या पोलीस कोठडीत १० जूनपर्यंत वाढ करण्याचे आदेश दिले, तसेच डॉ. तावरे, डॉ. हाळनोर, घटकांबळे यांच्या पोलीस कोठडीत ७ जूनपर्यंत वाढ करण्याचे आदेश दिले.शिवानी अगरवालने मुलाला वाचविण्यासाठी स्वत:च्या रक्ताचे नमुने ससून रुग्णालयात दिले होते. पोलिसांनी रक्ताचे नमुने जप्त करून न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले होते. याबाबत अहवाल पोलिसांना नुकताच मिळाला. रक्ताचे नमुने शिवानीचे असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले,असे सहायक पोलीस आयुक्त सुनील तांबे यांनी न्यायालयात सांगितले. अपघात प्रकरणातील तपासात प्रगती झाली आहे. अटक आरोपींची एकत्रित चौकशी करायची आहे. मोबाइल संच विश्लेषणातून माहिती मिळाली आहे, असे त्यांनी नमूद केले. आरोपींच्या वतीने ॲड. सुधीर शहा, ॲड. ऋषिकेश गानू, ॲड. प्रशांत पाटील, ॲड. विपूल दुशिंग, ॲड. शिवम निंबाळकर यांनी बाजू मांडली. आरोपी पोलीस कोठडीत आहे. पोलीस तपासातील प्रगती, तसेच नवीन कारणे देऊन कोठडी मागत आहेत. आरोपींची घरझडती पूर्ण झाली असून, त्यांचे मोबाइल संच जप्त करण्यात आले आहेत. आरोपींना न्यायालयीन कोठडी देण्यात यावी. आरोपींकडून तपासात सहकार्य करण्यात येईल, असा युक्तिवाद बचाव पक्षाच्या वकिलांनी केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद झाल्यानंतर न्यायालयाने आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ केली.न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल तपासात महत्त्वाचा ठरणार असून, या गुन्ह्याचा सखोल तपास करण्यात येत आहे. याप्रकरणात मंगळवारी अश्फाक इनामदार आणि अमर गायकवाड यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. गायकवाडची प्रकृती व्यवस्थित नसल्याने मंगळवारी त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याला रुग्णालयातून बुधवारी सोडण्यात आल्याची माहिती सहायक आयुक्त सुनील तांबे यांनी न्यायालयात दिली.शिवानी अगरवालला फरासखाना पोलीस ठाण्याच्या आवारातील कोठडीत (लॉकअप) ठेवण्यात आले आहे. वकिलांमार्फत न्यायालयात तक्रार नोंदवावी, असे आदेश देण्यात आले.अल्पवयीन मुलाला मोटार दिल्याप्रकरणी विशाल अगरवाल, तसेच मद्य विक्री प्रकरणी ब्लॅक आणि कोझी पबचे मालक आणि व्यवस्थापकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### फरासखाना कोठडीत अस्वच्छता

याप्रकरणी आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्या जामीन अर्जावर सोमवारी (१० जून) सुनावणी होणार आहे. जामीन अर्जावर पोलिसांनी त्यांचे म्हणणे न्यायालयात सादर केले आहे. याप्रकरणात अल्पवयीन मुलाची आई, बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल, ससूनमधील डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर, शिपाई अतुल घटकांबळे यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याचे आदेश विशेष न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांनी बुधवारी दिले.

# राज्यात शनिवारपासून जोरदार पावसाचा इशारा

## तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती आहे. बुधवारी (५ जून) मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होणे अपेक्षित होते. पण, प्रत्यक्षात मोसमी पाऊस गोव्यातच अडखळला आहे.**



गुरुवारी( ६ जून) तळकोकणात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. शनिवारपासून (८ जून) पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पूर्वमोसमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी पाऊस मंगळवारी (४ जून) गोव्यात दाखल झाला होता. मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे बुधवारी (५ मे) तळकोकणात पाऊस दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. प्रत्यक्षात पाऊस गोव्यातच अडखलला आहे. सिंधुदुर्गमध्ये बुधवारी ढगाळ वातावरण तयार झाले होते. तापमानात घटही झाली आहे. सिंधुदुर्गमध्ये काही ठिकाणी हलका पाऊसही झाला. पण, तो पूर्वमोसमी होता. गुरुवारी (६ जून) मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.हवामान विभागाने शनिवारी (८ जून) आणि रविवारी (९ जून) रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापुरात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. राज्याच्या अन्य भागातही जोरदार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी रविवारपासून पुढील दोन दिवस मुंबईसह सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडसह पश्चिम घाटात जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भासह राज्याच्या बहुतेक भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. सोमवारपर्यंत (१० जून) मोसमी पाऊस विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळता राज्यभरात दाखल होईल. रविवार, सोमवार आणि मंगळवारी मुंबईसह किनारपट्टी आणि पश्चिम घाटात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पुढील काही दिवस राज्यात पूर्वमोसमी पावसाचा जोर राहणार आहे.सोमवारपर्यंत (१० जून) मोसमी पाऊस विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे वगळता राज्यभरात दाखल होईल. रविवार, सोमवार आणि मंगळवारी मुंबईसह किनारपट्टी आणि पश्चिम घाटात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

### पूर्वमोसमी पाऊस पडण्याचा अंदाज

गुरुवारी( ६ जून) तळकोकणात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. शनिवारपासून (८ जून) पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पूर्वमोसमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी पाऊस मंगळवारी (४ जून) गोव्यात दाखल झाला होता. मोसमी पावसाच्या पुढील वाटचालीसाठी पोषक हवामान आहे.

# अजित पवार गटाला 'गळती'!

## राष्ट्रवादीचे प्रवक्ते विनायक रणसुभे यांचा शरद पवार गटात प्रवेश!

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला 'गळती' सुरू झाली आहे. आगामी महापालिका आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांनी आता हातात 'तुतारी' घेण्याची भूमिका घेतली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते विनायक रणसुभे यांनी आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला.**



यावेळी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे उपस्थित होते. राजकीय रणनितीकार आणि फर्डे वक्ते अशी विनायक रणसुभे यांची ओळख आहे. तसेच, ते अजित पवार गटातील माजी आमदार विलास लांडे यांचे निकटवर्ती आहेत. रणसुंबे यांच्या मागे आता लवकरच आणखी काही स्थानिक नेते शरद पवार गटात प्रवेश करतील, असा दावा केला जात आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत खरी राष्ट्रवादी कोणाची? याचे उत्तर मतदारांनी दिले आहे.

शरद पवार साहेबांच्या विचारांवर आणि नेतृत्त्वावर विश्वास ठेवून अनेकजण आगामी काळात पक्षात प्रवेश करतील. आता विधानसभा आणि महापालिका निवडणुकांमध्ये लोकसभा निवडणुकीची पुनरावृत्ती होणार आहे.

'जनाधार' हा शरद पवार साहेबांच्या पक्षाला आहे. त्यामुळे आगामी काळात शहरातील राजकीय चित्र बदललेले पहायला मिळेल.

### अजित पवार गटातील दिग्गज वेगळ्या विचारात!

लोकसभा निवडणुकीत पिंपरी-चिंचवडमध्ये शिरूर लोकसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि मावळ लोकसभा मतदार संघात श्रीरंग बारणे यांच्या विरोधात अजित पवाट गटातील काही नेत्यांनी छुप्या पद्धतीने काम केले. तसेच, भोसरी मतदार संघात काहीजणांनी 'तुतारी' चालवली, असा दावा केला जातो. राज्य पातळीवर शरद पवार गटाला मिळालेले यश पाहता आणि मतांची आकडेवारी पाहता पिंपरी-चिंचवडमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही दिग्गज नेते अजित पवार गटाला रामराम ठोकणार आहेत. कारण, महायुतीच्या जागावाटपामध्ये चिंचवड आणि भोसरीवर भाजपा दावा करणार असून, पिंपरी मतदार संघात विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांचा दावा राहणार आहे. परिणामी, विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या दिग्गजांना शरद पवार गट किंवा उद्धव ठाकरे गटाचा विचार करावा लागेल.

---

# भाजपतर्फे ७ हजार देशी झाडांचे रोपण

## जागतिक पर्यावरण दिन : शहराध्यक्ष शंकर जगताप यांची संकल्पना

### चिंचवडमध्ये 1450 बुथप्रमुखांनी पाच झाडे घेतले दत्तक

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडकरांच्या अवतीभवती सदा वृक्षराजी बहरलेली असावीत, यासाठी पिंपरी-चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या संकल्पनेतून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी ५ जून रोजी शहरात ७ हजार झाडे लावण्यात आले. पक्षाच्या प्रत्येक बुथ प्रमुखाच्या माध्यमातून त्या त्या भागात पाच झाडांची लागवड करून हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.**



शहरात शुद्ध हवा आणि ऑक्सिजनचे प्रमाण वाढविण्यासाठी वड, पिंपळ, चिंच, कडुनिंब, उंबर यांसारख्या देशी झाडांची लागवड करून ते झाडे बुथप्रमुखांनी दत्तक घेतले, अशी माहिती शंकर जगताप यांनी दिली. जल, जमीन आणि जंगल हे पर्यावरणाचे कान, नाक आणि डोळे आहेत. यापैकी कोणत्याही घटकाला झालेली इजा पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड व मिथेन या वायूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यावरण ही आज जगासमोरील ज्वलंत समस्या बनली आहे. निसर्ग संपत्तीचा ऱ्हास, पर्यावरण ऱ्हास, महापूर, चक्रीवादळे, दुष्काळ, जंगलातील वनवे, समुद्राच्या पाण्याच्या पातळीतील होणारी वाढ, ऋतुचक्रातील बदल, विविध प्रकारची महामारी अशा भयानक संकटांनी अनेक वनस्पती, पशु-पक्षी यांच्या जाती नष्ट होत असून, त्याची भयानकता मानवाच्या अस्तित्वावरही घाला घालत आहे. सुमारे पाच वर्षांपूर्वी कोव्हीड-१९ चा विषाणूने अफाट बुद्धिमान, हुशार आणि शक्तिशाली असलेल्या मानवाला घरात बंदिस्त केले. रात्रंदिवस धावणाऱ्या जगाला कोरोनाने स्तब्ध करून ठेवले. या महामारीने समस्त जगासाठी एक स्पष्ट संदेश दिला आहे. तो मानवाने समजून घेऊन, आपल्या वृत्तीत आणि कृतीत सुधारणा करणे वर्तमानाची गरज व भविष्याची मागणी आहे. या निसर्गाची 'इकोसिस्टीम' पुन्हा एकदा प्रस्थापित करण्याचा संकल्प गरजेचा आहे. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी संपूर्ण शहरात ७ हजारहून अधिक झाडांची लागवड केली, असे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले. शहरात विविध ठिकाणी झालेल्या या उपक्रमामध्ये सोसायटीधारक, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला तसेच शहर भाजपाचे पदाधिकारी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

### देशी झाडांची लागवड....

शहरात भाजपचे १ हजार ४५० बुथप्रमुख आहेत. या प्रत्येक बुथप्रमुखामार्फत त्या त्या भागात प्रत्येकी पाच झाडांची लागवड करण्यात आली. शहरात शुद्ध हवा आणि ऑक्सिजनचे प्रमाण वाढविण्यासाठी फक्त देशी झाडांचीच लागवड करण्यात आली. त्यामध्ये वड, पिंपळ, चिंच, कडुलिंब, उंबर यांसह अन्य देशी झाडांचा समावेश आहे. हवा शुद्ध करून ऑक्सिजनचे आणि पावसाचे प्रमाण वाढविण्यामध्ये देशी झाडांचा उपयोग होतो. त्यामुळे सर्व बुथप्रमुखांमार्फत देशी झाडे लावण्यात आले. तसेच या झाडांची लागवड करून बुथप्रमुखच ते दत्तक घेऊन संगोपन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




# शिवराज्याभिषेकाला लोकमान्यांचे प्राधान्य!

**३५० व्या शिवराज्याभिषेकदिनी प्रकाशित होणाऱ्या 'शिवराज्याभिषेक' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील हा संकलित-संपादित भाग; छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल टिळकांच्या 'धर्मनिरपेक्ष' विचारांचा ऊहापोह करणारा आणि टिळकांनी हे विचार कोणत्या संदर्भात मांडले असतील याचाही वेध घेणारा..**

४ एप्रिल, १९२० रोजी पुणे येथील खुन्या मुरलीधराच्या मंदिरात ल. ब. भोपटकर यांच्या भाषणावर केलेले अध्यक्षीय भाषण हे टिळकांचे महाराजांच्यावरील अखेरचे भाषण असावे, त्यामुळे या भाषणातील त्यांचे प्रतिपादन शिवरायांसंबंधीच्या त्यांच्या विचारांच्या निष्कर्षांवरून अखेरचा शब्द मानायला हरकत नसावी. या भाषणात टिळक म्हणतात, 'शिवाजी महाराजांनी एकटय़ा ब्राह्मणांकरिता किंवा मराठय़ांकरिता राज्य स्थापन केले नाही. महाराष्ट्रातील रहिवासी ते मराठे या दृष्टीने महाराजांनी येथे राज्य स्थापन केले. महाराष्ट्रात राहणारा, मग तो तेली असो, तांबोळी असो, जैन असो, लिंगायत असो किंबहुना, तो मुसलमान असला तरी तो मराठा आहे असे समजून त्यांच्या हिताकरिता रात्रंदिवस झटलात, तर स्वराज्य प्राप्त करून घेण्याचे उत्सवाचे अंतिम साध्य होईल, अशी मला खात्री वाटत आहे.' याच प्रकारचे विधान टिळकांनी १९०५ सालच्या अमरावतीतील उत्सवात केले होते, 'छत्रपती शिवाजी मोठा राजा होता. तो क्षत्रिय होता किंवा त्याने अफझलखानाचा वध केला म्हणून त्याचे उत्सव आम्ही करतो असे नाही. त्या वेळची आमच्या लोकांची स्थिती ओळखून तत्कालीन संकटातून आम्हास सोडवून आम्हास प्रगतीच्या मार्गास त्याने लावले म्हणून त्याचा आम्ही उत्सव करतो. छत्रपती शिवाजीच्या ठिकाणी एखादा मुसलमान जरी असता तरी त्याचा आम्ही गौरव केला असता.' त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचा 'उद्देश अफझलखानास मारण्याचा नव्हता, तर तत्कालीन प्रगतीच्या मार्गाच्या आड येणाऱ्या विघ्नाचे निवारण त्यांना करावयाचे होते. केवळ मुसलमान म्हणून त्याला मारण्याचा जर हेतू असता, तर छत्रपती शिवाजीने खानाच्या बायकोला दागिने वगैरे देऊन विजापुरास परत पाठवले नसते.'१९०६ च्या कलकत्ता येथील भाषणात टिळक म्हणाले, 'शिवाजी मुसलमान धर्माचा शत्रू नव्हता. त्यांच्या धर्मभावना न दुखवता तो मुगलांशी लढला. हा धर्माधर्मामधील लढा नव्हता. जुलूम आणि स्वातंत्र्य यांच्यातला हा झगडा होता. शिवाजीच्या चारित्र्याचे हे रहस्य आकलन केल्यास आजच्या स्थितीत मुसलमानांनादेखील या उत्सवात भाग घेण्यास दिक्कत वाटणार नाही' आणि उत्कर्ष बिंदू म्हणजे 'न जाणो एखादा शिवाजीसारखाच लोकाग्रणी इतर प्रांतांत जन्माला येईल. कदाचित, तो धर्माने मुसलमानही असेल.'



२ मे, १९०८ या दिवशीत दिलेल्या व्याख्यानात ते म्हणतात, 'रामचंद्रापेक्षा किंवा कृष्णापेक्षा शिवाजीची योग्यता अधिक किंवा तितकीच आहे काय? असा जर प्रश्न कराल तर मी त्याचे उत्तर 'होय' असेच देणार. रामचंद्राचे वर्णन प्राचीन असल्याने त्याच्या वर्णनाची योग्यता शिवाजीच्या वर्णनाइतकी असली तरी मनावर संस्कार करण्याच्या कामी त्याची योग्यता कमी आहे.' लोकमान्य टिळक शिवछत्रपतींच्या उत्सवात किती गुंतले होते, हे स्पष्ट करणारा एक प्रसंग आहे. १९०६ च्या उत्सवासाठी रायगडला जाण्याकरिता ते बोटीने मुंबईहून बाणकोटला व तेथून महाडला पोहोचले. तेथे त्यांना त्यांचे खासगी कारभारी बाबा विद्वांस यांनी पाठवलेली तार मिळाली, 'चिरंजीव तापाने अत्यवस्थ आहे. ताबडतोब परतावे.' टिळक परतले तर नाहीच, त्यांना उलट तारेने उत्तर दिले, 'उत्सव संपल्यानंतर त्वरेने परतू. तोपर्यंत पुण्याची खबर पाठवू नये.' यातील गर्भीत अर्थ उलगडून सांगायची गरज नाही.शिवकालीन समाजाने सेक्युलॅरिझम या विचारप्रणालीच्या उदयानंतर धर्माला मानवी जीवनाच्या इतर अंगांपासून बाजूला ठेवून, त्याच्याकडे पाहणे व वागणे शक्य झाले आहे. शिवकाळात ते शक्य नव्हते. धर्म हा घटक जीवनाच्या इतर घटकांशी नुसताच संलग्न नव्हता, तर त्याच्यावर प्रभाव पाडणारा व प्रसंगी त्यांचे निमंत्रण करणाराही होता आणि ही बाब इस्लामच्या संदर्भात अधिक स्पष्टपणे सिद्ध होत होती, त्यामुळे प्रश्न फक्त धर्मांतर किंवा बाटवाबाटवी यापुरता मर्यादित नव्हता.

## प्रासंगिक »

# चिंतनाची गरज

***लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. सर्व एक्झिट पोलचे निष्कर्ष बाजूला सारुन आलेल्या या निकालाने सत्तेसाठी 'एनडीए' व 'इंडिया' आघाडीत प्रचंड रस्सीखेच सुरु झाली आहे.***

२०१४ मध्ये मोदींनी काँग्रेसची सत्ता उलथवत पहिल्यांदाच भाजपला मोठा विजय प्राप्त करून दिला. त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत देखील भाजपला स्वबळावर ३०३ जागा मिळवून दिल्या; मात्र यावेळी एकट्या भाजपला सत्तेसाठी आवश्यक असणारा आकड़ा गाठता आलेला नाही. सध्या तरी केंद्रात जे पक्ष एनडीए मध्ये आहेत ते एनडीए सोबतच असल्याचा दावा केला जात असला तरी त्यांच्याबाबत ठोस काही सांगणे कठीण आहे.सर्व ठिकाणी विजेची सोययांसह भारतात सर्वच इन्प्रÂास्ट्रक्चर उभा केले. नितीन गडकरी यांना एकहाती अधिकार देऊन त्यांनी भारतभर रस्त्यांचे जाळे विणले. लेह लडाख या सीमेवरदेखील त्यांनी मोठे रस्ते, टनेल (बोगदे) अशा अनेक सुविधा निर्माण केल्या. इतकेच नबहे, तर मेक इन इंडिया ही योजना राबवली.

**भारतात जी लोकशाही पाऊणशे वर्षे टिकून आहे, निवडणुकीच्या माध्यमातून सत्ताबदल होतो, हे लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण मानले जाते, परंतु भारताला जे सार्वभौम गणराज्य म्हटले जाते, त्याचाही आधार संविधानच आहे. या आधीच्या निवडणुकांमध्ये लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या संविधानाची कधी चर्चा झाली नव्हती.**

# संविधान बदलाच्या चर्चेचा भाजपला फटका

परंतु या वेळी ती झाली आणि चर्चेचे परिणामही दिसले, हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणता येईल.२०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील अभूतपूर्व यशानंतर भाजपचा वारू चौखुर उधळला. प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या भाजप सरकारने देशाच्या सर्वसमावेशक विकासाची भूमिका घेण्याऐवजी राजकारणाच्या चिंधड्या उडविण्यास, विरोधी पक्षांना नेस्तनाबूत करण्यास सुरुवात केली. घटनात्मक संस्था, व्यवस्था खिळखिळ्या केल्या. देशाला एक संविधान आहे आणि त्या संविधानानुसार राज्यकारभार करायचा असतो, याचा पाशवी बहुमत मिळविलेल्या भाजपला विसर पडला. त्याचे पडसाद हळूहळू संविधानाने संरक्षण दिलेल्या समाजात उमटत होते. ते अदृश्य स्वरूपात होते. परंतु भाजपने चारशे पारचा नारा दिला आणि त्या पक्षाचे जबाबदार मंत्री, खासदार संविधान बदलाची भाषा बोलू लागले, त्यामुळे संविधान व लोकशाहीवर



निष्ठा असणारा वर्ग अस्वस्थ झाला. संविधानाने या देशातील अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, आर्थिक मागास, अल्पसंख्याक वर्गाला संरक्षण दिले आहे. उद्या संविधानच राहिले नाही, तर ८५ ते ९० टक्के लोकसंख्या असलेल्या या वर्गाला त्यांच्या अस्तित्वाची भीती वाटणे स्वाभाविक आहे. त्याचे पडसादही प्रचारात आणि निकालात उमटले.यापूर्वी ज्या लोकसभेच्या निवडणुका झाल्या, त्या वेळी भाजपसह सर्वच राजकीय पक्ष आम्ही बहुमत मिळवू व सत्तेवर येऊ असे दावे करीत होते. त्यात अप्रस्तुत असे काहीच नाही. मात्र या वेळी पहिल्यांदा भाजपने ४०० हून अधिक जागा जिंकणार असा दावा केला. चारसो पार कशासाठी तर संविधान बदलण्यासाठी अशी महाराष्ट्रातील आंबेडकरी विचारांचा प्रभाव असणाऱ्या समाजाची भावना झाली. त्यामुळे आंबेडकरवादी, डाव्या, पुरोगामी विचारांच्या बिगर राजकीय संघटना सक्रिय झाल्या. त्यांच्या त्यांच्या परीने संविधान बदलाच्या विरोधात भूमिका घेत राहिल्या व लोकांमध्ये तसा प्रचार सुरू केला. त्यामुळे निवडणुका जाहीर होण्याआधीपासूनच महाराष्ट्रात भाजपच्या विरोधात कशी राजकीय आघाडी उभी राहते, यावर आंबेडकरी समाजाचे लक्ष होते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व शिवसेना उद्धव ठाकरे गट यांची महाविकास आघाडी आधीपासून होतीच. त्यात वंचित बहुजन आघाडी सामील होते का, याबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. परंतु शेवटच्या क्षणी वंचित आघाडीने स्वतंत्रपणे निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महाराष्ट्रात २०१९ च्या निवडणूक निकालाची पुनरावृत्ती होईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मोदींना शपथ घेऊ द्या; पण सरकार टीकणार नाही!

## संजय राऊत यांचे सूचक विधान; इंडिया आघाडीची बैठक उत्साहात

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर सत्तास्थापनेचा पेच निर्माण झाला आहे. एनडीएला बहुमत मिळालं असलं तरीही इंडिया आघाडीही सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न करत आहे. भारतातील जनतेने मोदींच्या विरोधात कौल दिला असल्याचं इंडिया आघाडीच्या नेत्यांचं म्हणणं आहे. त्यामुळे त्यांच्याकडून बहुमत सिद्ध करण्याकरता जुळवाजुळ सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, यावरून ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी मोदींवर टीका केली आहे. इंडिया आघाडीची बैठक संपल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.**



"आम्ही राष्ट्रपती भवनात जाऊन सत्तास्थापनेचा दावा करणार आहोत", असं संजय राऊत म्हणाले. ते पुढे म्हणाले की, मोदींना शपथ घेऊद्या. पण नंतर खेळ सुरू होईल. हे सरकार चालणार नाही. आम्हाला तर वाटतं मोदींनी शपथ घ्यावी. ८ तारखेला नाही तर आज रात्रीच शपथ घ्यावी, त्यांच्यावतीने आम्ही पेढे वाटू."

"चंद्राबाबू आणि नितीश बाबू या दोन्ही बाबूंना देश ओळखतो. ते फक्त भाजपाचेच नाही, तर ते सर्व पक्षांचे आहेत. त्यांनी काँग्रेस आणि भाजपाबरोबर काम केलं आहे. मोदींना आघाडी चालवण्याचा किती अनुभव आहे? मोदींचा हम करे सो कायदा आहे. या आघाडीत व्यक्तिमत्त्व किती फिट बसतात हे पाहावं लागेल", असं म्हणत त्यांनी एनडीएवरही टीका केली. दरम्यान, इंडिया आघाडीकडूनही सरकार स्थापनेसाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. परंतु, योग्य वेळ आल्यानंतर आम्ही योग्य ती पावलं उचलू असं मल्लिकार्जुन खरगे इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर म्हणाले होते. त्यामुळे ही नेमकी योग्य वेळ कोणती याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे.

जनतेने मोदींविरोधात मतदान केल्याने जनतेच्या मनाप्रमाणे सरकार स्थापन केलं जाईल, असंही मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. परंतु, बहुमतासाठी इंडिया आघाडीकडे पुरेसे संख्याबळ नाही. बहुमतासाठी त्यांनी समविचारी पक्षांना एकत्र येण्याचं आवाहन केलं आहे. परंतु, एनडीएची साथ सोडून इंडिया आघाडीकडे हे जुने मित्र पक्ष येतील का? असाही प्रश्न उपस्थित होतोय. त्यामुळे सत्तास्थापनेसाठी इंडिया आघाडीची नेमकी स्ट्रॅटेजी काय? याकडेच राजकीय वर्तुळात सर्वांचं लक्ष आहे.

### भाजपा बहुमतापासून किती दूर?

लोकसभा निवडणुकीत भाजपाला केवळ २४० जागा मिळवता आल्या आहेत. बहुमतासाठी आणखी ३२ जागांची आवश्यकता आहे. भाजपाचा मित्र पक्ष असलेल्या टीडीपीचे आंध्र प्रदेशमध्ये १६ खासदार निवडून आले आहेत. तर नितीश कुमार यांच्या जेडीयूचे बिहारमध्ये १२ खासदार निवडून आले आहेत. भाजपाचा आणखी एक मित्रपक्ष लोक जनशक्ती पार्टीचे ५ खासदार निवडून आले आहेत. या तीनही पक्षांनी भाजपाला साथ दिली तर भाजपा सहज सत्ता स्थापन करू शकते.

### इंडिया आघाडीचं बलाबल किती?

इंडिया आघाडीकडे सध्या २३४ जागा आहेत. त्यांना सत्तास्थापनेसाठी ३८ जागांची गरज आहे. अपक्ष १८ खासदार आहेत. त्यामुळे टीडीपीचे १६ खासदार आणि इंडिया आघाडीची मोट बांधलेले नितीश कुमारांचे १२ खासदार इंडिया आघाडीबरोबर आले तर, इंडिया आघाडीला सहज सत्ता स्थापन करता येईल. परंतु, टीडीपीचे चंद्राबाबू आणि मध्य प्रदेशच्या नितीश कुमारांनी आधीच एनडीएला समर्थन दिल्याने ते पुन्हा इंडिया आघाडीत परतण्याची शक्यता फार कमी आहे.

# फडणवीसांनी राजीनामा देण्याचा विचारही करु नये

## पराभवाचाएकावर ठपका ठेवण्यात काही अर्थ नाही : छगन भुजबळ

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकीचा निकाल मंगळवारी लागला. भाजपने एनडीएसह ४०० जागा देशभरात जिंकण्याचा दावा केला होता. भाजपाला देशभरात २४० जागा मिळाल्या आहेत. तर महाराष्ट्रात फक्त ९ जागांवर यश मिळालं आहे. या निकालांची नैतिक जबाबदारी स्वीकारत देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देण्याची तयारी दर्शवली आहे. मात्र एकनाथ शिंदे यांनी त्यांच्याशी मी चर्चा करेन असं म्हटलंय. निवडणुकीत हार-जित होत असते असंही म्हटलं आहे. तर आता छगन भुजबळ यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.**

देवेंद्र फडणवीसांनी भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्रात अपेक्षित यश न मिळाल्याचं मान्य केलं आहे. तसेच, या पराभवाची संपूर्ण जबाबदारी आपली असल्याचं ते म्हणाले आहे. "कितीही गणितं मांडली तरी आमच्या जागा कमी आल्या आहेत हे वास्तव मान्य करावं लागेल. या निवडणुकीचं नेतृत्व भाजपाकडून मी करत होतो. त्यामुळे ज्या काही जागा कमी आल्या असतील, त्याची जबाबदारी माझी आहे. मी मान्य करतो की मी स्वत: यात कमी पडलो आहे. ती कमतरता भरून काढण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत", असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.भाजपाला महाराष्ट्रात ज्या परिस्थितीचा सामना करावा लागलेल्या त्या सगळ्या स्थितीची सगळी जबाबदारी मी स्वीकारतो आहे. आता मला विधानसभेत पूर्णवेळ उतरायचं आहे. त्यामुळे मी भाजपाच्या शीर्षस्थ नेतृत्वाला





विनंती करणार आहे की त्यांनी मला सरकारमधून मोकळं करावं आणि पक्षात पूर्णवेळ काम करण्याची संधी द्यावी. त्यानंतर पक्षनेतृत्व जे सांगेल, त्यानुसार मी सगळं करणार आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.देवेंद्र फडणवीस यांना आपल्यामुळेच हे सगळं झालं असावं असं वाटत असावं. यश आणि अपयश असेल ही सगळ्यांची जबाबदारी आहे. एकावर ठपका ठेवण्यात काही अर्थ नाही असं माझं मत आहे. महायुतीचं जहाज थोडसं वादळात अडकलं आहे. अशावेळी जे कॅप्टन आहेत त्यांनी अशी भूमिका घेणं बरोबर होणार नाही. सगळ्यांनी एकत्र राहून विधानसभेची जोरदार तयारी करायला हवी. नुकसान वगैरे जे काही भाजपा, एनडीएचं झालं आहे ते महाराष्ट्रातच झालं नाही. देशात अनेक ठिकाणी उलथापालथ झाली आहे. त्यामुळे त्याचा ठपका एकट्या फडणवीसांवर ठेवणं योग्य नाही. आम्ही सगळे त्यांच्या बरोबर आहोत, सगळे तुमच्या पाठिशी आहोत. येण्याऱ्या चार महिन्यात विधानसभा निवडणूक पार पडते आहे त्यात हे अपयश धुऊन काढलं पाहिजे असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.सरकारमधून अशा प्रकारे देवेंद्र फडणवीस यांनी दूर होऊ नये. देवेंद्र फडणवीस सरकारमधून दूर झाले तर अडचणी निर्माण होतील. सरकार व्यवस्थित चालण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेत असलं पाहिजे. त्यांनी उपमुख्यमंत्री असणं हे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी सोडून जाण्याचं, राजीनामा देण्याचा निर्णय घेऊ नये.

### दूर झाले तर अडचणी निर्माण होतील

जो निकाल लागला आहे, त्यामागे अनेक घटना आहेत. काही अडचणी निर्माण झाल्या आहेत, चुका झाल्या असतील. कापूस,सोयाबीनचे प्रश्न नडले हे देवेंद्र फडणवीसही म्हणाले होते. तसंच मी मागेही म्हटलं होतं की ४०० पारचा नारा विरोधी पक्षाने त्या विरोधात प्रचार केला होता. तो नारा द्यायला नको होता कारण संविधान बदलाच्या चर्चा त्यामुळे झाल्या. देशभरात उलटसुलट घटना झाल्या आहेत ज्याचा परिणाम निकालांवर दिसला आहे असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीचा निकाल मंगळवारी लागला. सरकारमधून दूर झाले तर अडचणी निर्माण होतील.

# राखीव जागांवर भाजपाला फटका!

## 2019 च्या तुलनेत काँग्रेसला तिप्पटीहून अधिक यश

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या निकालात भाजपाचा विजय होत असला तरी जागांच्या आकडेवारीत नक्कीच घसरण झाली आहे. निवडणूक निकालाच्या आधी समोर आलेले एक्झिट पोलचे आकडे पाहिल्यास त्यात भाजपाला एकहाती विजय मिळणार हे जवळपास निश्चितच दिसत होते पण काल निकालाच्या वेळी मतमोजणीच्या पहिल्या दुसऱ्या फेरीपासूनच चित्र पालटायला सुरुवात झाली. भाजपाच्या घसरणीपाठी अनेक महत्त्वपूर्ण मुद्दे म्हणजेच इंडिया आघाडीने मुख्यत: अनुसूचित जाती व जमातींसाठी आरक्षित असणाऱ्या लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रचाराच्या वेळी "संविधान वाचवा" हा मुद्दा उचलून धरला होता. तब्बल १३१ म्हणजेच अनुसूचित जातींसाठी आरक्षित ८४ जागा व अनुसूचित जमातींसाठी आरक्षित ४७ जागांचा निकाल पाहता या मुद्द्याने मोठे बदल घडवून आणल्याचं दिसतंय.**



लोकसभा निकालाचे अगदी शेवटपर्यंतचे अपडेट्स पहिले तरी सत्ताधारी भाजपाचा गट, ११ राज्यांमधील अनुसूचीत जातींसाठी आरक्षित ३० जागांवर आघाडीवर होता. पण २०१९ च्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी होते. मागील लोकसभा निवडणूक भाजपाने ४६ आरक्षित जागांवर विजय नोंदवला होता. यावरून हे स्पष्ट होते की यंदा भाजपाला एससीसाठी आरक्षित जागांवर विरोधी पक्षाला कडवी झुंज द्यावी लागली होती.मंगळवारी रात्री उशिरापर्यंत मतमोजणी सुरू असताना काँग्रेसने ९ राज्यांमधील १९ एससी आरक्षित जागांवर एकतर आघाडी घेतली होती व काही ठिकाणी विजयही प्राप्त केला होता. २०१९ च्या तुलनेत काँग्रेसला तिप्पटीहून अधिक यश यंदा मिळाले आहे. केवळ आरक्षित जागांचाच विचार केला तरी २०१९ मध्ये काँग्रेसने अनुसूचित जातींसाठी आरक्षित अशा सहाच जागा जिंकल्या होत्या यंदा ही संख्या १९ वर पोहोचली आहे. भाजपाच्या अंतर्गत सूत्रांच्या हवाल्याने इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, "या निकालाचा उलगडा केला तर एक बाब लक्षात येते की, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि त्यांच्या इंडिया आघाडीतील अन्य पक्षांनी सुद्धा प्रचारादरम्यान 'संविधानाला धोका' आणि 'आरक्षणाची भीती' हे मुद्दे आक्रमकपणे मांडले होते. विरोधी पक्षांच्या याच प्रचारामुळे दलित व आदिवासी गटांमध्ये आरक्षण गमावण्याची भीती निर्माण झाली असू शकते ज्यामुळे भाजपाला मोठा धक्का बसला." उल्लेखनीय बाब म्हणजे, उत्तर प्रदेशमधील समाजवादी पक्षाने २०१९ मध्ये एकही अनुसूचित जातीसाठी आरक्षित जागा जिंकली नाही पण यंदा काँग्रेससह युती करून त्यांनी युपीमध्ये सात जागा जिंकण्याची तयारी केली होती. यापैकी पाच जागी भाजपा, एका ठिकाणी अपना दल व एकीकडे बहुजन समाज पक्षाचे विद्यमान खासदार होते. दुसरीकडे तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालमध्ये एससीच्या सहा जागा जिंकण्याची तयारी केली होती. तर द्रविड मुन्नेत्र कळघमने (DMK) ने तामिळनाडूतील तीनही राखीव जागा जिंकल्या आहेत.जनशक्ती पार्टीने (रामविलास) बिहारमध्ये तीन अनुसूचित जातीच्या जागा जिंकल्या आहेत तर जेडी(यू) ने एक जागा जिंकली. आंध्र प्रदेशात तेलगू देसम पक्षाला तीन जागा जिंकता आल्या आहेत. भाजपाने उत्तर प्रदेशमध्ये आठ, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेशमध्ये प्रत्येकी चार, ओडिशा आणि गुजरातमध्ये प्रत्येकी दोन आणि आसाम, छत्तीसगड, दिल्ली, हिमाचल प्रदेश, झारखंड आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी एक जागा जिंकण्याची तयारी केली होती.२०१९ च्या निवडणुकीचा निकाल पाहिल्यास, भाजपाने त्यावेळी जिंकलेल्या ४६ जागांपैकी, सर्वाधिक म्हणजे १४ या उत्तर प्रदेशातील होत्या. तर पश्चिम बंगाल आणि कर्नाटकात प्रत्येकी पाच आणि मध्य प्रदेशात चार जागा भाजपाला आपल्या नावे करता आल्या होत्या. याउलट काँग्रेसला मात्र केरळ, पंजाब व तामिळनाडू अशा तीन राज्यात विखरलेल्या अवघ्या सहा जागी विजय प्राप्त झाला होता.

### काँग्रेस पक्ष 12 जागी आघाडीवर होता

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने याशिवाय पाच जागा जिंकल्या होत्या. तर डीएमके आणि वायएसआरसीपी या दोन्ही पक्षांना प्रत्येकी चार जागा मिळाल्या होत्या अनुसूचित जमातींसाठी आरक्षित ४७ जागांपैकी भाजपा २६ जागांवर आघाडीवर आहे, ज्यात मध्य प्रदेशातील सहा, ओडिशा, छत्तीसगड आणि गुजरातमधील प्रत्येकी चार आणि राजस्थानमधील एक जागा आहे. या जागांवर, सुद्धा भाजपाची घसरणच झाली असं म्हणता येईल कारण २०१९ मध्ये ST साठी आरक्षित ३१ जागा भाजपाच्या उमेदवारांनी जिंकल्या होत्या. २०१९ मध्ये काँग्रेसचा ST जागांवरील विजयाचा आकडा हा ४ होता. तर २०१४ च्या निकालात मंगळवारी रात्री उशिरापर्यंत काँग्रेस पक्ष तब्बल १२ जागी आघाडीवर होता.

# काश्मीरमध्ये माजी मुख्यमंत्री पराभूत

## मुफ्ती यांच्या पराभवामुळे घराणेशाहीचा अंत झाल्याचे संकेत

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरमध्ये माजी मुख्यमंत्र्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (पीडीपी) च्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी मंगळवारी मतमोजणी सुरू असतानाच आपापल्या लोकसभा मतदारसंघातून पराभव स्वीकारला.**

काश्मीरमधील निकालांनी येथील घराणेशाहीचा अंत झाल्याचे संकेत दिले आहेत. यंदा जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या ३५ वर्षांतील सर्वाधिक मतदान झाले होते.निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, बारामुल्ला लोकसभा मतदारसंघात तुरुंगात असलेले माजी आमदार शेख अब्दुल रशीद उर्फ इंजिनीअर रशिद यांनी माजी मुख्यमंत्री अब्दुल्ला यांचा पराभव केला. तर माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनीही अनंतनाग-राजौरी लोकसभा जागेवरील पराभव स्वीकारला. नॅशनल कॉन्फरन्सचे गुर्जर नेते मियां अल्ताफ यांनी त्यांचा मोठ्या फरकाने पराभव केला.प्रतिष्ठित श्रीनगर लोकसभा मतदारसंघात नॅशनल कॉन्फरन्सचे नेते आगा रुहुल्ला मेहदी यांनी



प्रतिस्पर्धी उमेदवार आणि पीडीपीचे युवा अध्यक्ष वाहीद पारा यांचा पराभव केला.आपनी पार्टीला त्याचे खाते उघडता आले नाही. पक्षाचे संस्थापक अल्ताफ बुखारी म्हणाले की, त्यांचा पक्ष आत्मपरीक्षण करण्यासाठी, त्यांच्या चुकांमधून शिकण्यासाठी आणि पक्ष मजबूत व अधिक लवचिक बनण्यासाठी या संधीचा उपयोग करेल.जम्मू मतदार संघात भाजपच्या जुगल किशोर यांनी काँग्रेसच्या रमण भल्ला यांचा पराभव केला तर उधमपूर मतदार संघात भाजपचे उमेदवार डॉ. जितेंद्र सिंग यांनी काँग्रेसच्या छ. लाल सिंग यांचा पराभव केला.कुपवाडा जिल्ह्यातील लंगेट विधानसभा क्षेत्रातील ५६ वर्षीय माजी आमदार रशिद यांना २०१९ मध्ये अटक करण्यात आली होती. दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झालेले ते पहिले मुख्य प्रवाहातील राजकारणी होते. त्यांचा प्रचार त्यांचा मुलगा अबरार याने केला होता.काश्मीरमधील निकालांनी येथील घराणेशाहीचा अंत झाल्याचे संकेत दिले आहेत. यंदा जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या ३५ वर्षांतील सर्वाधिक मतदान झाले होते.

### लडाखमध्ये अपक्षाची सरशी

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, बारामुल्ला लोकसभा मतदारसंघात तुरुंगात असलेले माजी आमदार शेख अब्दुल रशीद उर्फ इंजिनीअर रशिद यांनी माजी मुख्यमंत्री अब्दुल्ला यांचा पराभव केला. तर माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनीही अनंतनाग-राजौरी लोकसभा जागेवरील पराभव स्वीकारला. नॅशनल कॉन्फरन्सचे गुर्जर नेते मियां अल्ताफ यांनी त्यांचा मोठ्या फरकाने पराभव केला.प्रतिष्ठित श्रीनगर लोकसभा मतदारसंघात नॅशनल कॉन्फरन्सचे नेते आगा रुहुल्ला मेहदी यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार आणि पीडीपीचे युवा अध्यक्ष वाहीद पारा यांचा पराभव केला.आपनी पार्टीला त्याचे खाते उघडता आले नाही.

# रामायण' चित्रपटातील रणबीर कपूर व साई पल्लवीचा फोटो व्हायरल

बॉलीवूड सुपरस्टार रणबीर कपूर सध्या 'रामायण' या त्याच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणाऱ्या कलाकारांची माहिती आतापर्यंत लपवून ठेवण्यात आली होती. परंतु, अलीकडेच या चित्रपटातील प्रभू श्रीराम आणि देवी सीता या भूमिका साकारत असलेल्या कलाकारांचा पहिला लूक समोर आला आहे. सोशल मीडियावर 'रामायण' सेटवरील एक फोटो तुफान व्हायरल होत आहे. या फोटोमध्ये प्रभू श्रीराम यांच्या भूमिकेत रणबीर कपूर; तर देवी सीतेच्या भूमिकेत साउथ स्टार साई पल्लवी दिसत आहे. हे व्हायरल झालेले फोटो अधिकृतरीत्या 'झूम टीव्ही'ला प्राप्त झाले आहेत. 'रामायण'च्या सेटवरून हे फोटोज लीक झाले आहेत.अयोध्येचे युवराज प्रभू श्रीराम यांच्यासारखे पारंपरिक कपडे रणबीरने



परिधान केले होते. तर साईने देवी सीता यांच्यासारखी वेशभूषा केली होती. 'झूम टीव्ही'ने शनिवारी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून हे एक्सक्ल्युझिव्ह फोटो शेअर केले. या चित्रपटाद्वारे रणबीर आणि साई पल्लवीने पहिल्यांदाच एकत्रित काम केले आहे.भगवान रामाच्या भूमिकेसाठी रणबीर शाकाहारी आहार आणि वर्कआउट रूटीनचे पालन करीत असल्याची चर्चा सुरू होती. रणबीर आणि साई पल्लवी यांचे हे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. काही चाहत्यांनी आपल्या प्रतिक्रिया देत, चित्रपटासाठी शुभेच्छा दिल्या आहेत; तर काही नेटकऱ्यांनी साई पल्लवी आणि रणबीर यांच्या या जोडीला ट्रोलदेखील केले आहे."हा चित्रपट सुपर फ्लॉप होणार आहे", अशी कमेंट एका नेटकऱ्याने केली. "रणबीर अजिबात प्रभू श्रीराम यांच्यासारखा दिसत नाही.

## सोनू सूदचं व्हॉट्सॲप सुरू

बॉलीवूडचा सुप्रसिद्ध अभिनेता सोनू सूद अभिनयाव्यतिरिक्त त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत असतो. सोनू सूद एक समाजसेवक आहे. कोविडदरम्यान स्थलांतरीत मजुरांसाठी बसेसची व्यवस्था करून देण्यापासून ते अनेक सामाजिक कार्ये त्याने आतापर्यंत केली आहेत. या मदतीच्या भावनेमुळे सोनू सूद प्रेक्षकांच्या नजरेत 'हीरो' बनला आहे. सोनू सूद त्याच्या सोशल मीडियावर नेहमी सक्रिय असतो. अनेक गरजवंत त्याला सोशल मीडियाद्वारे संपर्क साधतात. अशातच सोनू सूदचं व्हॉट्सॲप अचानक बंद झालंय. याबाबत त्याने इन्स्टाग्राम, एक्स अशा सोशल मीडिया अकाउंटवर स्टोरी शेअर करत तक्रार केली आहे.सोनू सूदने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे, ज्यात असं दिसतंय की त्याच्या अकाउंटवरून व्हॉट्सॲप वापरलं जाऊ शकत नाही. याचा स्क्रिनशॉट स्टोरीवर शेअर करत सोनू सूदने लिहिलं, "३६ तास झालेत अजूनही माझं अकाउंट बंदच आहे. तुम्हाला यावर काम करण्याची अत्यंत गरज आहे. १०० गरजवंत लोक माझ्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असतील, कृपया तुम्ही तुमचे प्रयत्न करा."

## प्रार्थना बेहेरेने मागितली माफी



राज्यभरात आज शिवजयंतीचा जल्लोष पाहायला मिळत आहे. शिवजयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लातूरमधील एका कार्यक्रमात अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. त्यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.लातूरच्या उदगीर येथील एका मॉलच्या उद्घाटनासाठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे दाखल झाली होती. त्यावेळी उद्घाटनादरम्यान शुभेच्छा देताना सलग चार-पाचवेळा तिने महाराजांचा एकेरी शब्दात उल्लेख केला. त्यामुळे लातूरमधील शिवभक्तांकडून तिचा निषेध करण्यात येत आहे. तसेच अभिनेत्रीच्या स्वागतासाठी लावण्यात आलेले बॅनरदेखील फाडण्यात आले आहेत. तसेच प्रार्थनाने आता माफी मागावी, अशी मागणी शिवप्रेमींकडून करण्यात येत आहे.मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री प्रार्थना बेहेरे लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे एका व्यापारी प्रतिष्ठानच्या कार्यक्रमासाठी आली होती. यावेळी तिने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केला. अभिनेत्रीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. संतप्त झालेल्या शिवप्रेमींनी उदगीर शहरामध्ये अभिनेत्रीचे लागलेले बॅनर फाडत संताप व्यक्त केला. अभिनेत्रीच्या ही बाब लक्षात आल्यानंतर तिने नवा व्हिडीओ बनवून शिवप्रेमींची माफी मागितली आहे.प्रार्थना बेहेरेने छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केल्याने शिवभक्तांनी नाराजी दर्शवत तिच्या वक्तव्याचा जाहीर निषेध नोंदवला. अभिनेत्रीने जाहीर माफी मागावी अशी मागणी केली जात होती. अशातच आता अभिनेत्रीने एक व्हिडीओ शेअर करत जाहीर माफी मागितली आहे. प्रार्थना बेहेरे म्हणाली आहे,"आज मी उदगीर येथे किसान मॉलच्या उद्घाटनाला आले होते. तिथे आल्यावर माझ्याकडून चुकून काही बोलण्यात आले असेल तर त्या बद्दल मी तुम्हा सर्वांची माफी मागू इच्छिते. कृपा करून मला माफ करा, माझा त्या बोलण्याचा उद्देश चुकीचा नव्हता. मी परत म्हणते की छत्रपती शिवाजी महाराजांच्या

## सलमान गॅलेक्सी अपार्टमेंट सोडणार?

दोन आठवड्यांपूर्वी (१४ एप्रिलला) सलमान खानच्या मुंबईतील वांद्रे येथील घरावर दोन हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून आतापर्यंत चार जणांना अटक करण्यात आली आहे. या गोळीबाराच्या घटनेवर सलमान खानचा भाऊ अरबाज खानने प्रतिक्रिया दिली आहे. त्याचे कुटुंबीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घर सोडतील का? असं विचारल्यावर अरबाजने उत्तर दिलं आहे..गोळीबाराच्या घटनेनंतर खान कुटुंब गॅलेक्सी अपार्टमेंट सोडून दुसरीकडे राहायला जाणार का? असं विचारल्यावर तो म्हणाला "असं केल्याने सगळं ठीक होईल असं तुम्हाला वाटतं? नवीन ठिकाणी राहायला गेल्याने किंवा घर बदलल्याने येणारा धोका टळेल, असं खरंच होईल का? असं असतं तर नक्कीच घर बदलण्याचा विचार कोणीही करेल, पण घर बदलल्याने हा धोका टळणार नाही हे सत्य आहे. त्यामुळे तुम्हाला सावधगिरी बाळगून आयुष्यात पुढे जावं लागेल."अरबाजने सांगितलं की त्याचे वडील, ज्येष्ठ पटकथा लेखक सलीम खान अनेक दशकांपासून त्या घरात राहत आहेत. त्याचा भाऊ सलमानही बऱ्याच काळापासून याच घरात राहत आहे. "ते त्यांचं घर आहे," असं अरबाज सलमानबद्दल म्हणाला. सलमानचे घर गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये आहे आणि भाईजानची एक झलक पाहण्यासाठी चाहते त्याच्या घराबाहेर गर्दी करत असतात."हे ठिकाण सोडा आणि आम्ही तुम्हाला काहीच करणार नाही, असं कुणी म्हणत नाहीये. अशावेळी एखादी व्यक्ती एकच गोष्ट करू शकते ती म्हणजे खबरदारी घेणं. त्याशिवाय खासगी किंवा सरकारने पुरवलेली सुरक्षा व्यवस्था वापरू शकते. जितकं सामान्य जगता येईल.



## मला धूम्रपान करायला खूप आवडतं: विद्या बालन

आपल्या अप्रतिम अभिनयाच्या जोरावर विद्या बालनने इंडस्ट्रीत स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. टीव्हीपासून सुरुवात करणारी विद्या बॉलीवूडची आघाडीची अभिनेत्री बनली. दाक्षिणात्य अभिनेत्री सिल्क स्मिताची भूमिका तिने 'द डर्टी पिक्चर'मध्ये साकारली होती. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता आणि विद्याला त्यासाठी राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान विद्याला एक व्यसन जडलं होतं.'द डर्टी पिक्चर'नंतर विद्याला धूम्रपान करायची सवय लागली होती. तिने 'अनफिल्टर्ड बाय समदीश' या मुलाखतीत याबाबत माहिती दिली. सुरुवातीला ती ऑनस्क्रीन सिगारेट ओढायला तयार नव्हती, पण चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान तिला सिगारेटचं व्यसन जडलं, असं तिने सांगितलं आहे. विद्या म्हणाली, "या चित्रपटाआधी मी धूम्रपान केलं होतं, मला ते कसं करायचं हे माहित होतं, पण मी धूम्रपान करायचे नाही. पण एखादी भूमिका करताना तुम्ही धूम्रपान करण्याची नक्कल करू शकत नाही. आपल्याकडे धूम्रपान करणाऱ्या स्त्रियांबद्दल एक विशिष्ट समज आहे, त्यामुळे माझ्या चेहऱ्यावर तो संकोच असून चालणार नव्हतं. आता महिलांबद्दलचा हा समज खूप कमी झालाय, पण आधी तो खूप होता. 'द डर्टी पिक्चर' नंतर सिगारेटचं व्यसन जडलं आणि मी रोज दोन ते तीन सिगारेट ओढत असे.

# रोहित शर्माच्या नावे वर्ल्ड रेकॉर्ड!

## » रोहित शर्मा सर्वाधिक षटकार ठोकणाऱ्या फलंदाज

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**टी-२० विश्वचषक २०२४ च्या भारताच्या पहिल्याच सामन्यात रोहित शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर टीम इंडियाने मोठा विजय मिळवला. भारताच्या गोलंदाजांची भेदक गोलंदाजी आणि रोहित-पंतची फटकेबाजी यासह आयर्लंडवर टीम इंडियाने ८ विकेट्स आणि ४६ चेंडू राखून मोठा विजय मिळवला. रोहित शर्माने भारताच्या पहिल्याच सामन्यात शानदार अर्धशतक झळकावले. पण या अर्धशतकासह रोहित शर्माने एक विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे.**




टी-२० विश्वचषक २०२४ च्या भारतीय संघाच्या पहिल्याच सामन्यात रोहितने ३ षटकार मारून ऐतिहासिक विक्रम केला आहे. षटकार मारण्याच्या बाबतीत त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये असा आकडा गाठला आहे, ज्याच्या जवळपास दुसरा कोणीही फलंदाज नाही.कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ २०२४ च्या टी-२० विश्वचषकात खेळत आहे. रोहित शर्माने या सामन्यात तीन षटकार मारत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६०० षटकार पूर्ण केले आहेत. त्याच्या आधी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कोणत्याही खेळाडूला ६०० षटकार लगावता आलेले नव्हते. त्याचबरोबर ख्रिस गेल या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५५३ षटकार मारले आहेत. आयर्लंडविरूद्धच्या सामन्यात २६ धावा करत रोहित शर्माने टी-२० क्रिकेटमध्ये ४ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. ही कामगिरी करणारा तो विराट कोहली आणि बाबर आझमनंतरचा तिसरा खेळाडू ठरला आहे. विराट कोहलीच्या टी-२० क्रिकेटमध्ये ४०३८ धावा आहेत, तर बाबर आझमने टी-२० मध्ये एकूण ४०२३ धावा केल्या आहेत. रोहित शर्माने आपल्या १५२व्या सामन्यात ही कामगिरी केली आहे. त्याचबरोबर रोहितने सर्वात कमी चेंडू खेळून हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. रोहित शर्माने २८६१ चेंडूत ४००० धावांचा टप्पा गाठला आहे.रोहित शर्माने टी-२० वर्ल्ड कपमध्ये १००० धावा करण्याचा विक्रमही केला आहे. यापूर्वी भारतीय खेळाडू विराट कोहली आणि श्रीलंकेचा खेळाडू महेला जयवर्धने यांनी ही कामगिरी केली होती. विराट कोहलीने टी-२० क्रिकेट विश्वचषकात आतापर्यंत ११४२ धावा केल्या आहेत तर महेला जयवर्धनेने टी-२० विश्वचषकात १०१६ धावा केल्या आहेत. आयर्लंडविरूद्ध सामन्यात त्याने अर्धशतकाचा टप्पाही पार केला. रोहितचे हे टी-२० विश्वचषकातील हे १० वे अर्धशतक आहे. यासह, तो टी-२० विश्वचषकात सर्वाधिक अर्धशतके झळकावण्याच्या बाबतीत दुसऱ्या स्थानावर आला आहे. विराट कोहली १४ अर्धशतकांसह आघाडीवर आहे.टी-२० विश्वचषक २०२४ च्या भारतीय संघाच्या पहिल्याच सामन्यात रोहितने ३ षटकार मारून ऐतिहासिक विक्रम केला आहे. षटकार मारण्याच्या बाबतीत त्याने आहे, ज्याच्या जवळपास दुसरा कोणीही फलंदाज नाही.कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ २०२४ च्या टी-२० विश्वचषकात खेळत आहे. रोहित शर्माने या सामन्यात तीन षटकार मारत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६०० षटकार पूर्ण केले आहेत. त्याच्या आधी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कोणत्याही खेळाडूला ६०० षटकार लगावता आलेले नव्हते.

### 1000 धावा करण्याचा विक्रम

ख्रिस गेल या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५५३ षटकार मारले आहेत.आयर्लंडविरूद्धच्या सामन्यात २६ धावा करत रोहित शर्माने टी-२० क्रिकेटमध्ये ४ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. ही कामगिरी करणारा तो विराट कोहली आणि बाबर आझमनंतरचा तिसरा खेळाडू ठरला आहे. विराट कोहलीच्या टी-२० क्रिकेटमध्ये ४०३८ धावा आहेत, तर बाबर आझमने टी-२० मध्ये एकूण ४०२३ धावा केल्या आहेत. रोहित शर्माने आपल्या १५२व्या सामन्यात ही कामगिरी केली आहे. त्याचबरोबर रोहितने सर्वात कमी चेंडू खेळून हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. रोहित शर्माने २८६१ चेंडूत ४००० धावांचा टप्पा गाठला आहे.रोहित शर्माने टी-२० वर्ल्ड कपमध्ये १००० धावा करण्याचा विक्रमही केला आहे.

# जसप्रीत बुमराहने रचला इतिहास

## » बुमराहने टी-20 विश्वचषक 2024 ची सुरुवात मेडन ओव्हरने केली

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० विश्वचषक २०२४ चा आठवा सामना भारत आणि आयर्लंड यांच्यात न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात टीम इंडिया प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, जो भारताच्या वेगवान गोलंदाजांनी योग्य ठरवला. या सामन्यात स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने या स्पर्धेची सुरुवात चांगली केली आहे. आयर्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात एक षटक टाकताच त्याने इतिहास रचला. त्याचबरोबर अर्शदीप सिंगने बुमराहला मागे टाकत एक विक्रम आपल्या नावावर केला.**




जसप्रीत बुमराहने टी-२० विश्वचषक २०२४ ची सुरुवात मेडन ओव्हरने केली आहे. या सामन्यात त्याने डावातील सहावे षटक निर्धाव म्हणून टाकले. जसप्रीत बुमराहचे हे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ११ वे निर्धाव षटक आहे. यासह तो कसोटी खेळणाऱ्या देशाच्या गोलंदाजांमध्ये सर्वाधिक निर्धाव षटके टाकणारा गोलंदाज ठरला आहे. त्याने भुवनेश्वर कुमारला मागे टाकले आहे. भुवनेश्वर कुमारने त्याच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १० निर्धाव षटके टाकली होती. मात्र जसप्रीत बुमराह आता त्याच्याही पुढे गेला आहे.गेल्या टी-२० विश्वचषकात चमकदार कामगिरी करणाऱ्या अर्शदीप सिंगने यावेळीही चांगली सुरुवात केली आहे. पॉवरप्लेमधील एकाच षटकात त्याने २ विकेट्स घेतल्या. यासह,पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक 5विकेट घेणारा दुसरा भारतीय गोलंदाज ठरला आहे. त्याने जसप्रीत बुमराहला मागे टाकले आहे. जसप्रीत बुमराहच्या नावावर टी-२० आंतरराष्ट्रीय पॉवरप्लेमध्ये २५ विकेट्स आहेत. याचबरोबर अर्शदीप सिंगने पॉवरप्लेमध्ये २६ विकेट्स घेतल्या आहेत.

### बुमराहने सुरुवात चांगली केली

या यादीत भुवनेश्वर कुमार ४७ विकेटसह आघाडीवर आहे.अर्शदीप सिंगने १६व्या षटकात १७ धावा दिल्या आणि शेवटची विकेट धावबादच्या रूपात घेतली. अशाप्रकारे आयरिश संघ ९६ धावांत सर्वबाद झाला. आयर्लंडच्या सात फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. सातव्या क्रमांकावर आलेल्या गॅरेथ डेलेनीने सर्वाधिक २६ धावा केल्या. भारताकडून हार्दिक पंड्याने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर अर्शदीप सिंग आणि जसप्रीत बुमराह यांना प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. टी-२० विश्वचषक २०२४ चा आठवा सामना भारत आणि आयर्लंड यांच्यात न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात टीम इंडिया प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, जो भारताच्या वेगवान गोलंदाजांनी योग्य ठरवला. या सामन्यात स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने या स्पर्धेची सुरुवात चांगली केली आहे. आयर्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात एक षटक टाकताच त्याने इतिहास रचला.